प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०८.०४.२०२२**

## सिडकोची घरे ही सर्वसामान्यांसाठी परवडणारी - श्री. एकनाथ शिंदे

"सध्याच्या महागाई आणि मंदीच्या काळात सिडकोची परवडणाऱ्या दरातील घरे ही सर्वसामान्य नागरिकांसाठी फायदेशीर ठरणारी आहेत", असे उद्गार मा. श्री. एकनाथ शिंदे, मंत्री, नगर विकास यांनी काढले. सिडकोच्या जानेवारी-२०२२ गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीचा प्रारंभ श्री. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आला यावेळी त्यांनी दूरस्थ पद्धतीने आपला संदेश व्यक्त केला.

या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, श्री. शशिकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, श्री. फैयाज खान, महाव्यवस्थापक (गृहनिर्माण), सिडको यांसह सिडकोतील विभाग प्रमुख आणि अधिकारी दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते.

सिडको साकारत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासोबतच अन्य अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे नवी मुंबईमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांना घरांमध्ये केलेली गुंतवणूक ही भविष्यात फायदेशीर ठरणार असल्याचे सांगत श्री. एकनाथ शिंदे यांनी सोडतीमध्ये घर लाभलेल्या यशस्वी अर्जदारांचे अभिनंदन केले.

डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी प्रास्ताविकामध्ये गृहनिर्माण योजनेची संक्षिप्त माहिती देत सिडको सर्वसामान्यांच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले.

सदर संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे श्री. सुरेश कुमार, माजी लोकायुक्त यांच्या पर्यवेक्षणाखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या देखरेख समिती व्यतिरिक्त, अर्जदारांपैकी संतोष पिंपळे, मधुकर पिसाळ आणि राजेश चव्हाण यांनी पंच म्हणून काम पाहिले. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी बोलून दाखवली.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोतर्फे २६ जानेवारी २०२२ रोजी प्रारंभ करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत सुरुवातीस ५,७३० सदनिका तळोजा नोडमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यानंतर अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा म्हणून द्रोणागिरी, घणसोली, कळंबोली, खारघर आणि तळोजा नोडमधील आणखीन काही रिक्त सदनिकांची भर घालून एकूण ६,५०८ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या. एकूण ६,५०८ घरांपैकी १,९०५ घरे ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि ४,६०३ सदनिका ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या योजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

सिडकोतर्फे गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीसाठी वापरण्यात येणारी प्रणाली (सॉफ्टवेअर) ही पुणे स्थित प्रोबेटी सॉफ्ट या नामांकित कंपनीकडून विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणाली ही पूर्णत: मानवी हस्तक्षेपविरहित आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मुंबई येथील संगणक विभागाकडून या प्रणालीची तपासणी करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे काढण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांमधील निवडक प्रतिनिधींना पंच म्हणून सहभागी करून घेतले जाते. तसेच सोडती दरम्यान पात्र अर्जदारांच्या आणि सदनिकांच्या यादीची यादृच्छिक (Random) पद्धतीने सरमिसळ करण्यात येते. अत्यंत पारदर्शक व निष्पक्ष अशा या प्रक्रियेद्वारे सर्व अर्जदारांना समान संधी सुनिश्चित करण्यात येते.

जानेवारी-२०२२ गृहनिर्माण योजनेच्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**